# ऐच्छिक तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे आरोग्य सेवांमध्ये झालेल्या बदलांचे संकलन...



- पहिली आवृत्ती,
  **फेब्रुवारी २०१८**

- लेखन-संपादन
  **भाऊसाहेब आहेर**

- संकलन
  **ज्योती शेळके**

- मुखपृष्ठ संकल्पना
  **भाऊसाहेब आहेर**

- मुखपृष्ठ, कलानिर्देशन व मुद्रितशोधन
  **शारदा महल्ले**

- मुद्रण
  **संस्कृती प्रिंटर्स, पुणे**


- **विशेष सहकार्य-**ऐच्छिक तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील सर्व संस्था व कार्यकर्ते

- *या पुस्तकातील काही भाग हा लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील 'दवंडी' या त्रैमासिकामधून घेतलेला आहे*

- **साभार**
  - राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया
  - असोसिएशन फॉर इंडियाज् डेव्हलपमेंट (AID)

- **प्रकाशक**

  **साथी**
  फ्लॅट नं. ३ व ४, अमन (ई) टेरेस, डहाणूकर कॉलनी,
  कोथरूड, पुणे ४११ ०२९.
  फोन : (०२०) २५४७२३२५/६५००६०६६
  ई-मेल : sathicehat@gmail.com,
  sathicbmp@sathicehat.org
  वेबसाइट : www.sathicehat.org,
  www.cbmpmaharashtra.org




साथी प्रकाशन

ऐच्छिक तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे आरोग्य सेवांमध्ये झालेल्या बदलांचे संकलन...

### 'ऐच्छिक' तत्त्वावर राबवली जाणारी आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रिया...

## थोडक्यात पण महत्त्वाचं...

आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रिया प्रकल्प स्वरूपात स्वयंसेवी संस्था महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांमध्ये राबवत आहेत. बऱ्याचदा काही स्वयंसेवी संस्थांचा दृष्टिकोन प्रकल्प राबवताना 'निधी मिळाला असेल तेवढ्याच ॲक्टिव्हिटी' राबवणे असा असतो. पण लोकाधारित देखरेख ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. नागरिकांचा शासकीय आरोग्य यंत्रणेवरचा विश्वास वाढवणे, आरोग्यसेवा सर्वसामान्यांना आपला हक्क वाटतील यासाठी ही प्रक्रिया विविध प्रकारे प्रयत्न करते. असे काम करण्यासाठी 'प्रोजेक्ट' पद्धतीने काम करणाऱ्या संस्था फारशा उपयोगी नाहीत. हे ओळखून गावपातळीवर जनाधार असलेल्या, हक्कांच्या दृष्टिकोनाशी सुसंगत व प्रक्रिया राबवण्यासाठी 'ऐच्छिक' तत्त्वावर राजी असलेल्या ३४ संस्थांची निवड विस्तारीकरणासाठी करण्यात आली. कमी संसाधनांच्या आधारे ही प्रक्रिया राबवण्यासाठी संस्थांची क्षमता बांधणी करून करण्यात आली. देखरेख प्रक्रियेतून तयार झालेल्या संस्था, कार्यकर्ते, आरोग्यसेवा हक्कासाठी पुढे आलेले गट, लोकप्रतिनिधींच्या मार्फत ही प्रक्रिया बळकट आणि व्यापक होण्याच्या काही महत्त्वाच्या गोष्टी घडवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**शासकीय आरोग्य सेवांची जनजागृती यात्रा :** देखरेख प्रक्रिया गाव आणि तालुकापातळीवर पोचण्याच्या उद्देशाने, लोकांना आरोग्य केंद्रामध्ये कोणत्या सेवा मिळतात, सध्या कोणत्या योजना आहेत, आरोग्य सेवेचे हक्क कोणते, गावपातळीवर आरोग्य सेवा याविषयी लोकांमध्ये जागृती होण्यासाठी गावं व आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य हक्क जाणीवजागृती यात्रा काढण्यात येते. यामध्ये महत्त्वपूर्ण योजनांची माहिती देण्यासाठी भिंती रंगवणे, स्टिकर्स लावणे, पोस्टर प्रदर्शन लावणे, आरोग्य केंद्रामध्ये भेटी देणे या माध्यमातून आरोग्य हक्काची जाणीवजागृती करण्यात आली.

**कमी संसाधने, जनमत चाचणी आणि प्रभावी जनसंवाद :** आतापर्यंत देखरेखीची प्रक्रिया सखोल पद्धतीने राबवण्यात येते ज्यामध्ये मनुष्यबळ आणि वेळ जास्त देण्याची आवश्यकता आहे. परंतु या ऐच्छिक पद्धतीच्या क्षेत्रामध्ये प्रक्रिया वेगळ्या पद्धतीने राबवण्याचा एक नवा प्रयत्न करण्यात आला. जास्तीत जास्त लोकांकडून आरोग्य सेवेबद्दलचे मत जाणून घेण्यासाठी एस. टी. स्टॅन्ड, बाजार, चौक, गावाचा पार अशा गर्दीच्या ठिकाणी ही 'जनमत चाचणी' घेतली गेली. आठ जिल्ह्यामधून २१० गावं आणि ४२ प्रा.आ. केंद्रांमधून संस्था-संघटनांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये गाव, उपकेंद्र, प्रा.आ. केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयाची पाहणी केली. तसेच सोयी-सुविधा, कर्मचारी-अधिकाऱ्यांची उपलब्धता, औषध पुरवठा, वैद्यकीय कर्मचाऱ्यांची रुग्णांशी वागणूक आणि नाकारलेल्या सेवा या मुद्यांवर सविस्तर माहिती घेण्यात आली. गावपातळीच्या आरोग्य सेवांसाठी कार्यकर्ते गावपातळीवर

बैठका घेऊ लागले. काही गावांमध्ये तर कर्मचारी आणि तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या. तालुक्यानुसार १५ गाव आणि तीन प्रा. आ. केंद्रांचे मूल्यनापन कार्यकर्त्यांनी कमीत कमी वेळामध्ये वेगळ्या पद्धतीने केले. या मूल्यनापनाचे गाव आणि प्रा. आ. केंद्र प्रगतीपत्रकाचे आठ ते दहा फुटी मोठे बॅनर करून जनसंवादामध्ये लावण्यात आले. सामान्य लोकांना सेवांची परिस्थिती समजण्यासाठी रंगांचा वापर करण्यात आला. गंभीर सेवांना 'लाल रंग' आणि समाधानकारक सेवांना 'पिवळा' तर चांगल्या सेवांना 'हिरवा रंग' देण्यात आला. अनेक ठिकाणचे बॅनर हे लाल आणि पिवळ्या रंगांनी भरलेले होते. सेवांच्या सद्यःस्थितीचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी या पद्धतीचा एक चांगला 'इम्पॅक्ट' जनसंवादानध्ये झाला. जनसंवादांमध्ये आरोग्यसेवा नाकारल्या अशा घटनांचीही मांडणी करण्यात आली.

**बदल घडवणारे जनसंवाद :** लोकाधारित देखरेख विस्ताराच्या निनित्ताने या प्रक्रियेत सहभागी झालेल्या १४ तालुक्यात जनसंवाद घडले नि त्यांनी सकारात्मक बदलही घडवले. अनेक जनसंवादांमध्ये अधिकाऱ्यांनी तात्काळ सुधारणा घडवणारे निर्णय जाहीर केले. संगमनेरमधील अत्यंत दयनीय अवस्थेतील प्रा. आ. केंद्राचा प्रश्न जनसंवादामुळेच ऐरणीवर आला नि या दवाखान्याची दुरुस्तीही झाली. याच जनसंवादानध्ये ग्रानीण रुग्णालयातून संदर्भसेवेसाठी नियमबाह्य पैसे घेतले जात असल्याची तक्रार मांडली गेली. महत्त्वाची बाब म्हणजे जनसंवादातच तक्रारदारांना त्यांचे पैसे सर्वांसमोर मिळाले. शिराळा तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनसंवादानंतर सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. तर मंगळवेढ्यातील जनसंवादात जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी 'सरकारी दवाखान्यात आलेल्या सर्व रुग्णांना दवाखान्यातच औषधे मिळतील, चिठ्ठी लिहून दिली जाणार नाही.' अशी जाहीर हमी दिली. तर चार्मोशीमधील जनसंवादात नांडल्या गेलेल्या आरोग्यसेवा नाकारलेल्या घटनांची चौकशी करण्यासाठी संयुक्त समिती नेमण्यात आली. त्याचप्रमाणे आष्टी तालुकास्तर तक्रार निवारण समिती स्थापण्याचा निर्णयही जनसंवादातच झाला. अशा अनेक आशादायक, सकारात्मक गोष्टी या जनसंवादांनी घडवल्या आहेत. जनसंवादांनतर त्यांचे आयोजन करणाऱ्या संस्था पुढे आलेले प्रश्न-समस्या, झालेले निर्णय यांचा पाठपुरावा करत आहेत.

महाराष्ट्रातल्या १८०० प्रा. आ. केंद्रापैकी आतापर्यंत दोनशे ते अडीचशे आरोग्य केंद्रांपर्यंत लोकाधारित देखरेख प्रक्रिया पोचली आहे. कुठलाही नागरिक, गट, समूह, संस्था, संघटना कमी खर्चात, कमी वेळात आणि कमी मनुष्यबळानध्ये देखरेख प्रक्रिया राबवू शकते हे या प्रक्रियेनं दाखवून दिलं. सर्वात विशेष म्हणजे या प्रक्रियेने शासकीय आरोग्यसेवा नि नागरिक यांना जवळ आणले. एक दुरावत चाललेला दुवा सांधला. यापुढील काळात तो आणखी घट्ट व्हायला हवा. लोकाधारित देखरेख प्रक्रियेचा विस्तार म्हणजे सरकारी आरोग्यसेवांचे मजबुतीकरण हे समीकरण जनमाणसात रुजायला हवे.

■■

# अनुक्रमणिका

## ठसा जनसंवादाचा


सरकारी दवाखाना झाला चकाचक! → ०७

जेव्हा समस्यांना तोंड फुटते! → ०८

आणि गावात रुग्णवाहिका आली! → ०९

झाले चिठ्ठी मुक्त सरकारी दवाखाने → १०

उपकेंद्रातील बाळंतपणाचं बिल झालं बंद → ११

जनसंवादामुळे झाला मेटिखेडा प्रा. आ. केंद्राचा कायापालट → १२

जनसंवादानंतर १५ दिवसात आरोग्य समस्या गायब → १३

जनसंवादाचा झटका.... जोरसे लगा → १४-१५

वैद्यकीय अधिकारी झाले कामावर रुजू → १६-१७

जनसंवादामुळे उघडले ग्रामीण रुग्णालयाच्या स्वच्छतागृहांची कुलुपे → १८-१९

कोळशाने झाली टोल फ्री नंबर्सची जाहिरात → २०

जिल्हे १०

तालुके ३२

प्रा.आ.केंद्र ९६

गावं ४८०

## आश्वासनं जनसंवादातील...


२२ रेबिज्‌ची लस सरकारी दवाखान्यातच मिळेल!

२३ बेकायदेशीररित्या पैसे घेणाऱ्या आरोग्यसेविकेची होणार चौकशी

२४ तळेगाव दिघे प्रा. आ. केंद्राला कार्यरत करण्याची आश्वासनपूर्ती

२५ बेजबाबदार वैद्यकीय अधिकारी सुधारणार का?

२६-२७ अखेर कुसुमबाईची जखम बरी झाली

२८-२९ विहीरगावचे आरोग्य पथक झाले पुन्हा कार्यरत

३०-३१ गाव आरोग्य समितीचा पुढाकार


## आरोग्य समस्यांचा चेंडू आमदारांच्या ‘कोर्टात’


३३ बेजबाबदार वैद्यकीय अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा!

३४ मद्यपी डॉक्टरांना आमदारांची तंबी!

३५ यवतमाळ जिल्ह्यात लोकाधारित देखरेख सुरू व्हावी!

३६ औषध तुटवड्याची गंभीर समस्या विधानसभेत मांडणार!

# ठसा जनसंवादांचा

*२०१४ पासून ऐच्छिक तत्त्वावर राबवली जाणारी आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रिया जनसंवादांच्या रूपात दहा जिल्ह्यांमध्ये पोहोचली. प्रकल्प प्रभावक्षेत्राबाहेरील ३२ तालुक्यांमध्ये जनसंवाद झालेत. ९६ प्रा. आ. केंद्र नि ४८० गावं या निमित्ताने आरोग्यसेवांच्या समस्यांबद्दल बोलती झाली. ही घुसळण, घडामोड आरोग्यसेवांवर आपला ठसा उमटवून गेली.*

## *असे काही निवडक ठसे...*

# सरकारी दवाखाना झाला चकाचक!

अहमदनगरमधील संगमनेर तालुक्यात 'लोक पंचायत' या संस्थेने फेब्रुवारी, २०१४ मध्ये जनसंवाद आयोजित केला. तालुक्यातील शेकडो स्त्री-पुरुष या जनसंवादात सामील झाले. याप्रसंगी आरोग्य यंत्रणेचे प्रतिनिधित्व तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले. आरोग्य सेवकांच्या गावभेटींमधील अनियमितता, आशा कार्यकर्तींना योग्य प्रशिक्षण नाही, जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत मोफत वाहन सुविधा न मिळणे अशा अनेक समस्या यावेळी उपस्थितांनी मांडल्या. यावेळी सर्वात लक्षवेधी तक्रार एका प्रा. आ. केंद्रातील अस्वच्छतेची ठरली.

काही नागरिकांनी तळेगाव व धांदरफळ या प्रा. आ. केंद्रांमधील अस्वच्छतेची छायाचित्रं जनसंवादात सर्वांना दाखवली. दवाखान्यातील अस्वच्छतेमुळे कुणीच या दवाखान्यात जात नाही अशी तक्रार मांडण्यात आली. या तक्रारीवर उत्तर देतांना वैद्यकीय अधिकारी म्हणाले, "स्वच्छता कर्मचारी आम्हाला सहकार्य करत नाहीत." जनसंवादातील पॅनेलचे एक सदस्य स्थानिक पत्रकार होते. त्यांनी दुसऱ्या दिवशी 'दवाखान्यात घाण-दुर्गंधी, वैद्यकीय कर्मचाऱ्यांची मनमानी!' अशा मथळ्याची बातमी प्रसिद्ध केली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ही बातमी आपल्या सर्व स्टाफसमोर वाचली. याचा सकारात्मक परिणाम झाला. जनसंवादात अधिकाऱ्यांनी 'आठवडाभरात परिस्थितीत सुधारणा होईल' असे आश्वासन दिले होते. पण प्रत्यक्षात दुसऱ्या दिवसापासूनच धांदरफळ प्रा. आ. केंद्र चकाचक दिसू लागले..



# जेव्हा समस्यांना तोंड फुटते!



कारंजा लाड या वाशिममधील तालुक्यात 'मनोदय' या संस्थेने जनसंवादाचे आयोजन केले. या संस्थेमार्फत बचत गटांची खूप मोठी साखळी कार्यरत आहे. यामुळे संस्थेचा गावोगावच्या महिलांमध्ये चांगला संपर्क आहे. त्यामुळे या जनसंवादाला पाचशेहून जास्त महिला उपस्थित होत्या. वाशिम हा महाराष्ट्राच्या विदर्भ पट्ट्यातील एक कोरडवाहू जिल्हा आहे. हा जिल्हा महाराष्ट्रातील सर्वाधिक गरीब जिल्ह्यांपैकी एक मानला जातो. अशा भागात शासकीय आरोग्य सेवा अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावतात. बहुसंख्य नागरिक गरीब असल्याने त्यांना सरकारी आरोग्य सेवांचाच आधार असतो. अशा जिल्ह्यात सरकारी आरोग्य सेवांबद्दलची नितांतता जनसंवादाद्वारे अधोरेखित झाली नसती तर नवल.

येथील जनसंवादात आरोग्य सेवांशी निगडित इतक्या समस्या पुढे आल्या की वेळेअभावी नागरिकांना थांबवणे भाग पडले. गरीब तालुक्यातील गरीब महिला, वैद्यकीय अधिकाऱ्यांसमोर समस्या मांडताना घाबरतील अशी शंका स्थानिक आयोजकांना होती. पण सरकारी डॉक्टर खासगी दवाखाना कसे काय चालवू शकतात? आरोग्य सेवक गावभेटी का देत नाहीत? आशा कार्यकर्तींना मेडिसिन कीट का मिळत नाही? अशा असंख्य समस्या या जनसंवादामध्ये मांडल्या गेल्या. सर्वदेखत जनतेच्या प्रश्नांना सामोरे जाताना अधिकारीच यावेळी काहीसे गांगरताना दिसले.

एका छोट्या बाळाला प्रा. आ. केंद्रातून अमरावतीला पुढील उपचारांसाठी पाठवले गेले. पण वाहनखर्च मिळाला नाही. ही समस्या एकाने मांडली तेव्हा अधिकाऱ्यांनी लगेचच 'रुग्ण कल्याण समिती' निधीतून या पैशांची तजवीज केली. अशा अनेक समस्या यावेळी पुढे आल्या नि अनेकांवर मार्गही निघाले. समस्यांना तोंड फोडण्याचे काम या जनसंवादाने केले.

# आणि गावात रुग्णवाहिका आली!

कळंब तालुक्यातील आसोली गावातील लोक एका रिक्षा चालकाशी हुज्जत घालत होते. 'ग्रामज्योत' संस्थेच्या कार्यकर्त्या सीमाताई पवार यांनी सहज त्या लोकांना हटकले. तेव्हा समजले - एका व्यक्तीला साप चावला आहे. त्याला १५ कि.मी. वरील मेटिखेडा प्रा.आ. केंद्रात न्यायचंय. पण रिक्षावाला जास्त पैसे मागतोय. तेवढे पैसे देणं या लोकांना परवडणारं नाही.

सीमाताईंना २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी कळंब येथे झालेल्या जनसंवादात 'तातडीच्या प्रसंगी १०८ या टोल फ्री नंबरवर संपर्क केल्यास मोफत रुग्णवाहिका मिळते' ही माहिती मिळाली होती. त्यांनी त्या अडचणीत सापडलेल्या लोकांना आपल्याजवळील माहिती सांगितली. त्या लोकांनीही लगेच १०८ हा दूरध्वनी क्रमांक लावला. लगेचच रुग्णवाहिका आली देखील. पण वाहनाची सोय करण्यात तसा बराच वेळ गेला होता. म्हणून मग रुग्णवाहिकेसोबत आलेल्या आरोग्य सेवकाने रुग्णाला यवतमाळच्या रुग्णालयात पोहोचवायचं ठरवलं. रुग्ण वेळेत दवाखान्यात पोहोचला नि त्याचे प्राणही वाचले. या प्रसंगात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या जनसंवादाचा प्रभाव उपयोगी ठरला असं म्हणता येईल.



# झाले चिठ्ठी मुक्त सरकारी दवाखाने...



राज्यातील सरकारी दवाखाने 'झिरो प्रिस्क्रिप्शन' व्हावेत यासाठी सरकारने ३५० कोटींची औषध खरेदी केली आहे.' असे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. पण प्रत्यक्षात या वृत्ताची प्रचिती मात्र नागरिकांना येत नाही. सांगोला तालुक्यातील जनसंवादात हीच समस्या प्रकर्षाने पुढे आली. 'सरकारी दवाखान्यातल्या पेशंटला कधीच औषधं मिळत नाहीत, डॉक्टर फक्त चिठ्ठी लिहून देतात. मग सरकारच्या 'झिरो प्रिस्क्रिप्शन' दवाखान्यांच्या दाव्याचे काय?' हा सवाल जनसंवादात पुन्हा पुन्हा विचारला गेला. त्यामुळे जनसंवादात उपस्थित जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या प्रतिनिधींना स्पष्ट आदेश देणं भाग पडलं.

'प्रा.आ. केंद्रात अपुरा औषधसाठा असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्ण कल्याण निधीचा वापर करून औषधं खरेदी करावीत. याउपरही एखाद्या रुग्णाला औषधांची चिठ्ठी द्यावी लागल्यास त्या औषधांचे बिल रुग्ण कल्याण निधीमधून द्यावे.' असे आदेश जनसंवादातच देण्यात आले. पण या आदेशाची अंमलबजावणी व्हायची तर रुग्ण कल्याण समित्यांची बैठक तर व्हायला हवी. जनसंवादानंतर भराभर रुग्ण कल्याण समितीच्या बैठका होऊ लागल्या. नि आता सांगोल्यातील प्रा. आ. केंद्रांमध्ये रुग्णांना औषधं मिळू लागली. ही किमया घडली जनसंवादामुळे...

# उपकेंद्रातील बाळंतपणाचं बिल झालं बंद...

'सामाजिक सहयोग संस्था' व 'रेशनिंग कृती समिती' यांनी लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात सलग दोन वर्षे जनसंवाद आयोजित केला. पहिल्या जनसंवादामध्ये एक समस्या मांडली गेली होती. 'तुंगी उपकेंद्राच्या निवासी आरोग्यसेविका बाळंतपणासाठी पैसे घेतात.' आरोग्यसेविकेच्या कामाबद्दल कोणाची तक्रार नव्हती. उलट आरोग्यसेविकेच्या ख्यातीमुळे अनेक ग्रामीण महिला तुंगी उपकेंद्रात बाळंतपणासाठी येतात. पण ही बाळंतपणं मोफत व्हायला हवीत. तशी ती होत नव्हती. जनसंवादात तक्रार झाली तरीही पैसे घेणं बंद झालं नव्हतं.

औसामधील दुसऱ्या जनसंवादात पुन्हा आरोग्यसेविकेच्या पैसे घेण्याबद्दल तक्रार उपस्थित झाली. यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी 'संबंधित आरोग्यसेविकेला निलंबित करावे' असे जाहीर केले. अर्थात आरोग्यसेविकेला अशी शिक्षा व्हावी असे कुणालाही वाटत नव्हते. केवळ गरीब ग्रामीण महिलांना सरकारी सेवा मोफत मिळावी एवढीच माफक अपेक्षा होती. आरोग्यसेविकेलाही आपली चूक जनसंवादामुळे लक्षात आली. तिने सर्वांसमोर दिलगिरी व्यक्त केली. निलंबनाचे आदेश मागे घेतले गेले. आता तुंगी उपकेंद्रातून मोफत बाळंतपणं होताहेत. जनसंवादानंतरच्या दहा महिन्यात या उपकेंद्रातून २०५ बाळंतपणं झालीत. पैकी १२० म्हणजे ५९ टक्के बाळंतपणं रात्रीच्या वेळी पार पडलीत. ग्रामीण भागातील गैरसोईंच्या पार्श्वभूमीवर तुंगी उपकेंद्रातील बाळंतपणाची संख्या खूपच आश्वासक आहे. खासगी दवाखान्यातील बाळंतपणांचा खर्च विचारात घेतला तर तुंगी उपकेंद्रातील मोफत बाळंतपणांचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते. या मोफत सेवेचे श्रेय जनसंवादाला द्यायला हवे.



# जनसंवादामुळे झाला मेटिखेडा प्रा.आ. केंद्राचा कायापालट




यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यात फेब्रुवारी २०१४ मध्ये जनसंवाद झाला. या जनसंवादात मेटिखेडा प्रा. आ. केंद्राशी निगडित समस्या चर्चेत आल्या. जनसंवादापूर्वी तालुका अपंग समितीचे सदस्य व 'ग्रामज्योत संस्थे'च्या कार्यकर्त्यांनी या प्रा. आ. केंद्राला भेट दिली होती. या भेटीदरम्यान प्रा. आ. केंद्राच्या परिसरात जागोजागी कचऱ्याचे ढीग, दवाखान्यातील गाद्या, चादरी अस्वच्छ, संडास नादुरुस्त, विजेची वायरिंग उखडल्याने धोकादायक स्थिती आढळली. दवाखान्यातील अस्वच्छतेचा त्रास अपंग व्यक्तींना जास्तच होतो हे देखील या भेटीत नोंदवण्यात आले. काही अपंग व्यक्तींना आपल्या तळहातावर चालावे लागते. अशा परिस्थितीत सर्वत्र घाणीचे साम्राज्य असेल तर धडधाकट माणसे ढांगा टाकून पुढे जातील पण अपंग व्यक्तीने काय करावे? या सर्व समस्या जनसंवादात मांडल्या गेल्या.

जनसंवादानंतर मेटिखेडा प्रा. आ. केंद्राचा एकदम कायापालटच झाला. कळंब तालुका अपंग समितीच्या कार्यकर्त्यांनी जनसंवादानंतर पुन्हा मेटिखेडा प्रा. आ. केंद्राला भेट दिली. या भेटीत कार्यकर्त्यांना दवाखान्यातील विजेचे जुने फिटिंग बदलले आहे, रुग्णांच्या खाटांवर नवीन गाद्या, बेडशीट, उशा आहेत, संडासमध्ये स्वच्छता हे बदल आढळले. विशेष म्हणजे अपंग व्यक्तींना दवाखान्यात अग्रक्रमाने सेवा मिळावी ही जनसंवादातील सूचना देखील आता दवाखान्यात अंमलात आणली जात आहे असंही आढळलं.

### आढळलेले बदल

- विजेचे जुने फिटिंग बदलले आहे.
- बेडशीट, उशा आहेत.
- संडासमध्ये स्वच्छता.
- रुग्णांच्या खाटांवर नवीन गाद्या आहेत.
- अपंग व्यक्तींना दवाखान्यात अग्रक्रमाने सेवेची अंमलबजावणीही केली जात आहे.



# जनसंवादानंतर १५ दिवसात आरोग्य समस्या गायब

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात फेब्रुवारी, २०१५ मध्ये 'अंकुर युवा प्रतिष्ठान' या संस्थेने जनसंवादाचे आयोजन केले. या जनसंवादामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती सभापतींच्या प्रतिनिधींनी पॅनेलिस्टची प्रभावी भूमिका निभावली. पॅनेलच्या पुढाकारामुळे १५ दिवसांच्या आत ८० टक्के समस्यांचे निराकरण झाले. पानशेवडी, कुरळा व पेठवड या तीन प्रा.आ. केंद्रांबद्दल जनसंवादामध्ये समस्या उपस्थित करण्यात आल्या होत्या.

पानशेवडी प्रा.आ. केंद्रात अस्वच्छतेचा प्रश्न तीव्र होता. तर कुरळा प्रा.आ. केंद्रात औषधसाठ्याची कमतरता होती. दवाखान्यात औषधांसाठी कपाट नसल्याने औषधे नसतात असे कारण कुरळा प्रा.आ. केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनसंवादात सांगितले होते. पेठवड प्रा.आ. केंद्राची रुग्णवाहिका किरकोळ दुरुस्तीअभावी बंद होती. याशिवाय तालुक्यातील आशांना मानधन मिळालेले नाही, प्रा.आ. केंद्रांमध्ये कुत्रा व सर्पदंशावरील लसी उपलब्ध नसतात, दवाखान्यात वीजपुरवठ्याची समस्या आहे, जननी सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना पैसे मिळालेले नाहीत, ग्रामीण रुग्णालयातील गैरसोई अशा अनेक समस्या या जनसुनवाईमध्ये मांडल्या गेल्या. जनसंवादात पॅनेलने वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून १५ दिवसात जास्तीत जास्त समस्या सुटायला हव्यात असा आग्रह धरला. जनसुनवाईनंतर तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत खास बैठकही घेण्यात आली. या बैठकीत तालुका पातळीवर कोणकोणत्या समस्या सुटण्यासारख्या आहेत यावर चर्चा झाली. या चर्चेची निष्पत्ती म्हणजे, कुरळा प्रा.आ. केंद्राला औषधसाठ्यासाठी कपाटाची खरेदी करण्यात आली, पेठवड प्रा.आ. केंद्राची रुग्णवाहिका सुरू झाली नि पानशेवडी प्रा.आ. केंद्रात स्वच्छता मोहीम राबवली गेली. विशेष म्हणजे या स्वच्छतेनंतरच्या काळातच जिल्हा परिषदेकडून स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रा.आ. केंद्र स्वच्छता स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पेठवड प्रा.आ. केंद्राने या स्पर्धेत पारितोषिक मिळवले.



इच्छाशक्ती असेल तर स्थानिक पातळीवरच आरोग्यसेवांशी निगडित बहुतेक समस्या सुटू शकतात. हा विश्वास कंधारच्या जनसंवाद व नंतरच्या पाठपुराव्याने निर्माण केला आहे.

*गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यातील कोरेगाव, कुरुड आणि सावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणाऱ्या मौजा चोप, विसोरा, कुरुड व लाडज या गावांतील काही गरोदर महिलांकडून आरोग्य कर्मचाऱ्यांनी संदर्भसेवा देण्याकरिता पैसे घेतल्याची तक्रार पुढे आली. प्रकरण जनसंवादात आले तर पुन्हा एकदा आरोग्य यंत्रणेच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका उपस्थित होईल. आरोग्य अधिकाऱ्यांनाच या प्रश्नाला सामोरे जावे लागेल. या भीतीने तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनसंवादाच्या आधीच संबंधित महिलांचे पैसे परत करण्याच्या सूचना तीनही प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या.*

# जनसंवादाचा झटका... जोरसे लगा



शासकीय आरोग्य यंत्रणेकडून रुग्णांना संदर्भसेवा मोफत दिली जात असली तरी काही ठिकाणी या सेवेसाठी रुग्णांकडून पैशाची मागणी केली जाते. २०१५ मध्ये देसाईगंज तालुक्यातील पहिल्या जनसंवादात असाच एक प्रकार पुढे आला. देसाईगंज तालुक्यातील कोरेगाव, कुरुड आणि सावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणाऱ्या मौजा चोप, विसोरा, कुरुड व लाडज या गावांतील काही गरोदर महिलांकडून आरोग्य कर्मचाऱ्यांनी संदर्भसेवा देण्याकरिता पैसे घेतल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणाची जागीच शहानिशा करून तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना पैसे परत करण्याचे आदेश दिले. ज्या कर्मचाऱ्यांनी पैसे घेतले होते त्यांनी एक महिन्याच्या आत संबंधित महिलांना पैसे परत केले.

मात्र २०१६ मध्ये पुन्हा एकदा याच प्राथमिक आरोग्य केंद्रात या प्रकाराची पुनरावृत्ती झाली. काही गरोदर महिलांकडून ॲम्ब्युलन्समध्ये डीझेल भरण्यासाठी ४०० ते १००० रुपयांपर्यंत पैसे घेण्यात आले. पैसे घेणारी व्यक्ती कधी गाडीचा चालक असायचा तर कधी इतर कर्मचारी. गरोदर महिलांना संदर्भ सेवा मोफत मिळते. हे माहीत असूनही बाळंतपण सुरक्षित

व्हावे व खासगी दवाखान्यात जाणे परवडणारे नसल्याने नाईलाजास्तव पैसे द्यावे लागायचे. याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही काही उपयोग झाला नाही. उलट त्यांच्याकडून "पेशंटचं सगळं व्यवस्थित पार पाडायचं असेल, त्याला वाचवायचं असेल तर पैसे द्या आणि जिल्हा रुग्णालयात घेऊन जा अन्यथा घरी न्या." अशी उत्तरं मिळत.

१६ मार्च २०१६ ला होणाऱ्या जनसंवादासाठी या तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असणाऱ्या तीस गावांमध्ये आरोग्य सेवांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी 'जनमत चाचणी' घेण्यात आली. जनमत चाचणी दरम्यान संदर्भ सेवेसाठी काही गरोदर महिलांकडून पैसे घेतल्याचे पुढे आले. जनमत चाचणीद्वारे समोर आलेल्या इतर मुद्द्यांसह हा मुद्दाही तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.दिलीप कांबळे यांच्यासमोर मांडण्यात आला. प्रकरण जनसंवादात आले तर पुन्हा एकदा आरोग्य यंत्रणेच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका उपस्थित होईल. आरोग्य अधिकाऱ्यांनाच या प्रश्नाला सामोरे जावे लागेल. या भीतीने तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनसंवादाच्या आधीच संबंधित महिलांचे पैसे परत करण्याच्या सूचना तीनही प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या. जनसंवादाच्या दोन दिवस आधी ज्या महिलांकडून पैसे घेण्यात आले होते त्यांना ते घरी जाऊन परत करण्यात आले.

१६ मार्च २०१६ जनसंवादामध्ये अनेक मुद्यांसोबत गरोदर महिलांकडून संदर्भ सेवेकरिता घेण्यात आलेल्या पैशांची चर्चा झाली. संबंधित वैद्यकीय अधिकारी, नर्स, वाहन चालक यांनी घेतलेल्या पैशांची कबुली देखील दिली. संबंधित महिलांना दोन दिवस आधीच पैसे परत दिले असून यापुढे असा गैरप्रकार घडणार नाही. याची ग्वाही तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली. शिवाय अजूनही कोणाकडून अशाप्रकारे पैसे घेतले असतील तर त्यांनी बिनधास्तपणे सांगावे व आपले पैसे परत घ्यावेत असे आश्वस्तही केले. तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाने आरोग्य सेवेच्या विश्वासार्हतेला तडा जाण्यापासून वाचवले. लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे अशा प्रकारच्या लाचखोरीला पायबंद घालता येऊ शकतो असे तुर्तास तरी म्हणता येईल.



# वैद्यकीय अधिकारी झाले कामावर रुजू

*लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेमुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना मनमर्जी करणे आता अवघड होऊ लागले आहे. डॉक्टर असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष असल्याने आपल्या पदाचा गैरवापर करत सतत गैरहजर असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मनमानी कारभाराला जनसंवादामुळे चाप बसला. गैरहजर असणारे वैद्यकीय अधिकारी शिस्तीत कामावर रुजू झाले. लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे लोकप्रतिनिधीही आपली जबाबदारी नीट पार पाडू लागले असल्याचेच यावरून दिसून येते.*



यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील शिवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी नियुक्त होते. त्यातले एक कायमस्वरूपी नियुक्त असलेले वैद्यकीय अधिकारी २०१४ ते २०१५ या वर्षात विविध कारणे दाखवून सतत गैरहजर राहायचे. ते डॉक्टर असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष असल्याने आपल्या पदाचा गैरवापर करत असल्याचे निदर्शनास येत होते. तरी कर्मचारी तक्रार करण्यास धजावत नव्हते. त्यामुळे शिवणी प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार दुसऱ्या कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांवरच अवलंबून होता. गावकऱ्यांनी अनेकदा तक्रारी करूनही सतत गैरहजर असणाऱ्या या महाशयांवर काहीच परिणाम होत नव्हता.

लोकाधारित देखरेख प्रक्रियेंतर्गत जनसंवादाच्या तयारीसाठी 'रसिकाश्रय' संस्थेचे कार्यकर्ते शिवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात गेले असता, त्यांना वैद्यकीय अधिकाऱ्याच्या या मनमानीबद्दल कळाले. दिनांक १९ जानेवारी २०१५ च्या जनसंवादात या मुद्यावर घमासान चर्चा झाली. जनसंवादात तालुका वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे डॉक्टर व केळापूर आर्णीचे आमदार राजू तोडसाम उपस्थित होते. वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सतत

अनुपस्थितीमुळे दुसऱ्या कंत्राटी डॉक्टरांवर कामाचा ताण पडत असल्याने शिवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा नीट मिळत नसल्याने गावकरी नाराज झाले होते. लोकांची नाराजी लक्षात घेऊन राजू तोडसाम यांनी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना याबाबत कडक सूचना दिल्या. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कामावर रुजू व्हावे यासाठी पत्राद्वारे वारंवार सूचित केले असूनही ते कामावर रुजू होत नसल्याची तक्रार तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मांडली. त्यांना पुन्हा एकदा पत्र देण्यात यावे. त्यांनी जर ही बाब गांभीर्याने घेतली नाही तर, त्यांच्यावर रितसर कारवाई करावी अशी सूचना आमदारांनी केली. शासनाने तुम्हाला लोकांच्या सेवेसाठी नेमले असून संघटनेच्या कामासाठी नाही; अशी तंबी देत आमदार राजू तोडसाम यांनी जनसंवादात उपस्थित गावकऱ्यांना दिलासा दिला. दुसऱ्या दिवसापासून सतत गैरहजर असणारे वैद्यकीय अधिकारी शिस्तीत कामावर रुजू झाले. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी अशा कामचुकार अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता वेळीच कारवाई केली तर लोकांचे बरेचसे प्रश्न मार्गी लागतील यात शंका नाही. लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे लोकप्रतिनिधीही आपली जबाबदारी नीट पार पाडू लागले आहेत.





*देशात घरोघरी शौचालयाचे वारे वाहत असताना वेंगुर्ला ग्रामीण रुग्णालयात मात्र रुग्णांना रात्रीच्या वेळी शौचालयासाठी उघड्यावरच बसावे लागते. वेंगुर्ले ग्रामीण रुग्णालयात रात्रीच्या वेळी बाथरुम-संडासला कुलुपे घातली जातात. सकाळी ड्युटी बदलल्यावरच कुलुपे उघडली जातात. रात्रीच्या वेळी रुग्णालयात दाखल असणाऱ्या रुग्णांनी कुठे जायचं? जनसंवादात या अनपेक्षितपणे उपस्थित झालेल्या प्रश्नावर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. माईणकर यांनी तातडीने या समस्येत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले. आणि पुन्हा असा प्रकार घडणार नाही, याची हमी दिली.*

# जनसंवादामुळे उघडले ग्रामीण रुग्णालयाच्या स्वच्छतागृहांची कुलुपे



जानेवारी २०१४मध्ये सिंधुदुर्गमधील वेंगुर्ले तालुक्याच्या जनसंवादात तुळस, आडेली, रेडी या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्थितीची माहिती दिली जात होती. हिरवा रंग, पिवळा रंग, आणि लाल रंग म्हणजे काय ते समजावून सांगितलं जात होतं. जिल्हा शल्य चिकित्सक, तालुका वैद्यकीय अधिकारी, पॅनलमधील पत्रकार यांच्यासमोर जमलेले ग्रामस्थ, 'अभिनव फाऊंडेशन संस्थे'चे कार्यकर्ते सार्वजनिक आरोग्य सेवांसंदर्भात प्रश्न मांडत होते. वेंगुर्ले आणि परिसरातील नागरिकांसाठी हे सर्व नवीनच होत. असे कार्यक्रम घेऊन काय प्रश्न सुटलेत? असा तिरकस मालवणी शेराही ऐकू आला.

वेंगुर्ले तालुक्यातील आरोग्य केंद्रांच्या स्थितीविषयक काही समाधानकारक बाबीही होत्या. महत्त्वाचं म्हणजे माता व बालमृत्यचे प्रमाण अगदी नगण्य होते. उपचाराअभावी एकाही बालकाचा मृत्यू झाला नव्हता. तसेच गावपातळीवर आशांच्या मिळणाऱ्या सेवाही समाधानकारक होत्या. परंतु सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात लॅबची सुविधा नव्हती, आडेली आरोग्य केंद्रात रुग्णवाहिका नव्हती, डॉक्टरांच्या रिक्त पदांची समस्याही भेडसावत होती. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. ए.एस. कुलकर्णी यांनी नवीन रुग्णवाहिका खरेदी

करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्याचे सांगत त्याचा आपण पाठपुरावा करू असे सांगितले. तुळस आरोग्य केंद्रात लॅबची सुविधा महिन्याभरात सुरू होईल, असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे कंत्राटी पद्धतीने प्रयोगशाळा तंत्रज्ञाची नेमणूक करून लॅब सुरू झाली.

जनसंवादात उपस्थित पत्रकार विनायक वारंग यांनी वेंगुर्ले ग्रामीण रुग्णालयाविषयी समस्या मांडली. वरवर अगदी छोटा वाटेल असा पण रुग्णाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा प्रश्न जनसंवादामध्ये मांडला गेला. वेंगुर्ले ग्रामीण रुग्णालयात रात्रीच्या वेळी बाथरूम-संडासला कुलुपे घातली जातात. सकाळी ड्युटी बदलल्यावरच ही कुलुपे उघडतात. रात्रीच्या वेळी रुग्णालयात दाखल असणाऱ्या रुग्णांनी कुठे जायचं? या अनपेक्षितपणे उपस्थित झालेल्या प्रश्नावर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. ए.एस. कुलकर्णी यांनी तातडीने या समस्येत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले. आणि पुन्हा असा प्रकार घडणार नाही, याची हमी दिली.

या प्रकाराची कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता, रात्रीच्या वेळी बाथरूममध्ये रुग्णांचे नातेवाईक जेवणाचे डबे घासतात. त्यामुळे पाईप चोकअप होतात. या कारणाने बाथरूम - शौचालयाला कुलूप लावत असल्याचे त्यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांनी शोधलेला उपाय म्हणजे आजारापेक्षा इलाज भयंकर ठरला होता. अखेर तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या सुचनेनुसार बाथरूमच्या बाहेर येथे 'जेवणाचे डबे धुऊ नयेत'; असा फलक लावून रात्रीच्या वेळी बाथरूम- शौचालयाची कुलुपे उघडली ती कायमचीच .....



वरवर पाहता कोणाला ही समस्या अगदी शुल्लक स्वरूपाची वाटू शकेल. पण रुग्णाशी निगडित कोणताही निर्णय घेण्याअगोदर बाळंतपणासाठी किंवा बाळंतपणानंतर शुश्रुषेकरिता दाखल होणाऱ्या महिला, वयोवृद्ध तसेच सर्व प्रकारचे रुग्ण रात्रीच्या वेळी नैसर्गिक विधी कुठे करतील? हा प्रश्न आरोग्य कर्मचाऱ्यांना महत्त्वाचा वाटू नये! रुग्णाप्रति असलेल्या असंवेदनशीलतेतूनच असे प्रकार घडतात का? तेव्हा जनसंवादासारख्या माध्यमातून अशा प्रश्नांना वाचा फुटू शकते. त्यातूनच आरोग्य कर्मचाऱ्यांची रुग्णांप्रती संवेदना वाढीस लागू शकते.

# कोलशाने झाली टोल फ्री नंबर्सची जाहिरात





फेब्रुवारी २०१४ मध्ये कळंब तालुक्यात जनसंवाद झाला. या जनसंवादानंतर गावपातळीवरील आरोग्यसेवांमध्ये अनेक सुधारणा दिसत आहेत. जनसंवादामध्ये येथील उमरगावच्या महिलांनी अनेक समस्या मांडल्या होत्या. गावातील आशा कार्यकर्तीकडे औषधे नसतात, आरोग्यसेविका गावात येत नाही. या गावात दिवसातून दोनदाच एस. टी. बस येते. गावात दवाखाना नसल्याने गावकऱ्यांना उपचारांसाठी गावाबाहेर जाण्यास केवळ या गाडीचाच आधार आहे. या पार्श्वभूमीवर आशा कार्यकर्ती व आरोग्यसेविकेच्या सेवांची गरज जनसंवादामध्ये मांडली गेली.

एरवी उमरगावच्या समस्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्याच नसत्या. जनसंवादामुळे गावातील महिलांनी अधिकाऱ्यांपुढे आपले गाऱ्हाणे मांडले. अधिकाऱ्यांनीही निकड लक्षात घेऊन 'परिस्थितीत बदल होईल' अशी ग्वाही जनसंवादातच दिली होती. त्याप्रमाणे लवकरच गावातील आशा कार्यकर्तीला औषध कीट उपलब्ध झाले. बचत गटाच्या महिलांशी आरोग्यसेविका सल्लामसलत करू लागली.

विशेष म्हणजे जनसंवादानंतर तर उमरगाव व वेलोरी या गावातील गावकऱ्यांनी एक वेगळीच मोहीम सुरू केली. ही मोहीम आहे एका जनजागृतीची. 'तातडीच्या आरोग्यसेवांसाठी १०८ हा टोल फ्री नंबर फिरवा नि रुग्णवाहिका बोलवा' या आशयाच्या सूचना वरील दोन्ही गावांतील भिंतींवर जागोजागी कोळशाने लिहिलेल्या आढळत आहेत.

# आश्वासनं जनसंवादातील...

*सध्या आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रिया 'प्रकल्प' स्वरूपात १४ जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे. या प्रक्रियेचा विस्तार व्हावा यासाठी आणखी १० जिल्ह्यांमध्ये या प्रक्रियेतील इतर घडामोडी ऐवजी केवळ जनसंवाद घडवल्या गेले. हे जनसंवाद घडले नसते तर देखरेख प्रक्रियेव्यतिरिक्त असलेल्या भौगोलिक प्रदेशातील आरोग्य समस्यांना व्यासपीठ मिळाले नसते नि त्या समस्या सुटतील असं जाहीर आश्वासनही अधिकाऱ्यांनी दिलं नसतं. जनसंवादात मांडलेल्या अशा काही समस्या नि त्यावर मिळालेली आश्वासनं...*




# रेबिजची लस सरकारी दवाखान्यातच मिळेल!



वाणीचिंचोळे या गावातील धरती गडहिरे या मुलीच्या पायाला गावातील भटका कुत्रा चावला. धरती ही गरीब कुटुंबातील असल्यामुळे ती लगेच दवाखान्यात जाऊ शकली नाही. त्या दिवशी तिचे आई-वडील मोलमजुरीसाठी रानात गेले होते. धरती घरी एकटीच होती. तिने आई-वडिलांची संध्याकाळपर्यंत वाट पाहिली. धरतीच्या पालकांनी तिला दुसऱ्या दिवशी मैत्रिणीसोबत घेरडी प्रा.आ. केंद्रात जाऊन इंजेक्शन घ्यायला सांगितले. त्याप्रमाणे धरती दुसऱ्या दिवशी तिच्या गावापासून आठ कि. मी. अंतरावरील प्रा.आ. केंद्रात आली. पण दवाखान्यात डॉक्टर उपस्थित नव्हते. दोन तास डॉक्टरांची वाट पाहत बसलेल्या धरतीला नर्सने सांगितले, "दवाखान्यात रेबिज़ची लस नाही. त्यामुळे डॉक्टरांची वाट पाहूनही काही उपयोग नाही..." धरतीसमोर आपल्या गावी परत जाण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

धरती ही दलित समाजातील गरीब मुलगी असल्याने तिला सरकारी दवाखान्याची मोफत सेवाच घेणे अनिवार्य वाटत होते. गावातील कोणीतरी धरतीला भोसे प्रा.आ. केंद्रात लस मिळू शकेल अशी माहिती दिली. भोसे हे मंगळवेढा तालुक्यातील मोठे गाव. वाणीचिंचोळेपासून हे गाव ९ कि.मी. अंतरावर आहे. धरती भोसे प्रा. आ. केंद्रात आली. पण इथेही 'रेबिजची लस उपलब्ध नाही' हेच पालूपद तिला ऐकावं लागलं. शिवाय या दवाखान्यातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सांगितलं, "आंधळगाव प्रा. आ. केंद्रात जा! तिथे कदाचित लस मिळेल." भोसे ते आंधळगाव हे अंतर साधारणतः १० ते १२ कि. मी. आहे. धरती आता आंधळगाव प्रा. आ. केंद्रात आली. पण या दवाखान्यातही रेबिज़ची लस उपलब्ध नव्हती. तीन प्रा. आ. केंद्रांकडून लसीसाठी नकार, शिवाय गाडीभाड्यावर झालेला खर्च याने निराश झालेल्या धरतीने अखेर खासगी दवाखान्यातून रेबिजची लस घेतली. खासगी दवाखान्यात तिला रेबिजचे तीन डोस व ते घेण्यासाठी झालेला गाडीभाड्याचा खर्च यावर साधारणतः दोन हजार रुपये खर्च आला. याशिवाय मनःस्ताप झाला तो वेगळाच. त्यामुळे 'शिरा पुरी - जा त्या घरी'चा हा खेळ गरीब दलित रुग्णांना आरोग्य यंत्रणेकडून आणखी किती दिवस सहन करावा लागेल? असा सवाल संतापलेल्या धरतीने **सांगोल्या**तील जनसंवादामध्ये उपस्थित आरोग्य यंत्रणेला केला.

धरतीसोबत घडलेली हकीकत **मंगळवेढा** येथील जनसंवादात पुन्हा मांडली गेली. कारण धरतीने ज्या सरकारी दवाखान्यांचे उंबरे झिजवले त्यातील दवाखाने मंगळवेढ्याच्या हद्दीत आहेत. या जनसंवादातही आरोग्य यंत्रणेने रेबिज लसींच्या तुटवड्याची समस्या मान्य केली. पण यापुढे सरकारी दवाखान्यात लसींचा पुरवठा केला जाईल असे आश्वासन स्थानिक आरोग्य यंत्रणेने जनसंवादामध्ये दिले.

# बेकायदेशीररित्या पैसे घेणाऱ्या आरोग्यसेविकेची होणार चौकशी

२७ मार्च, २०१५ रोजी तासगाव तालुक्यात जनसंवाद झाला. या जनसंवादामध्ये दोन महिलांनी एक तक्रार जनसंवादाच्या पॅनेलसमोर मांडली. या दोनही महिलांकडून गर्भपाताच्या शस्त्रक्रियेसाठी आरोग्यसेविकेने प्रत्येकी १५०० रुपये घेतले होते. या महिलांनी जनसंवादामध्ये आपली तक्रार मांडावी यासाठी 'संग्राम' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना धीर दिला. पण जनसंवादामध्ये ही समस्या मांडली जाणार असल्याची कुणकुण लागताच संबंधित आरोग्यसेविकेने 'संग्राम' संस्थेच्या कार्यकर्त्यांना फोनवरून धमकी दिली. 'माझी बदनामी करत असल्याने तुमची पोलिसांकडे तक्रार करीन' असं ही आरोग्यसेविका कार्यकर्त्यांना धमकावू लागली. आणखीही काही महिलांकडून या आरोग्यसेविकेने पैसे घेतले होते. या सर्व महिलांना फोन करून या आरोग्यसेविकेने जनसंवादात जाऊ नये असे सांगितले. पण तरीही दोन महिलांनी जनसंवादात येऊन ही समस्या मांडलीच.

संबंधित प्रा. आ. केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मात्र 'आपणाला झाल्या प्रकाराची काहीच माहिती नाही' अशी भूमिका घेतली. संबंधित आरोग्यसेविका देखील जनसंवादात उपस्थित नव्हती. त्यामुळे या आरोग्यसेविकेची तालुका वैद्यकीय अधिकारी चौकशी करतील. या चौकशीत आरोग्यसेविका दोषी आढळल्यास ज्या महिलांचे पैसे तिने घेतले आहेत त्यांचे त्यांना परत करायला आरोग्यसेविकेला भाग पाडलं जाईल असं आश्वासन जनसंवादामध्ये उपस्थितांना दिले गेले...




# तळेगाव दिघे प्रा.आ. केंद्राला कार्यरत करण्याची आश्वासनपूर्ती



'लोकपंचायत' या संस्थेच्या सहयोगाने अहमदनगरमधील संगमनेर तालुका पातळीवर जनसंवाद झाला. या जनसंवादाआधी स्थानिक कार्यकर्त्यांनी कार्यक्षेत्रातील प्रा. आ. केंद्रांच्या स्थितीचा आढावा घेतला होता. तेथील आरोग्य समस्यांच्या दुर्दशेचे ठोस पुरावे मिळवले होते. जनसंवादामध्ये गावकऱ्यांनी तळेगाव दिघे प्रा. आ. केंद्राशी निगडित समस्या तीव्रतेने मांडल्या. या प्रा. आ. केंद्रातील कर्मचारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही जुमानत नाहीत, रुग्णांशीही उद्दाम वर्तणूक करतात, दवाखान्यात अतिशय अस्वच्छता असते, दवाखान्यातील सक्शन मशिन अनेक दिवसांपासून नादुरुस्त आहे, दवाखान्यात बाळंतपणं जवळपास केलीच जात नाहीत अशा अनेक तक्रारी यावेळी उपस्थित करण्यात आल्या. जनसंवादात पॅनेलिस्ट असलेले तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन शिंदे यांनी या सर्व तक्रारींची गंभीर दखल घेऊन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे संबंधित समस्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन जनसंवादामध्ये उपस्थितांना दिले.

जनसंवादानंतर अवघ्या आठवड्याभरात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गांडळ यांनी तळेगाव दिघे प्रा. आ. केंद्राच्या कार्यक्षेत्रातील गावांना भेट दिली. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी जनसंवादात मांडल्या गेलेल्या तक्रारींची स्वतः शहानिशा केली. या भेटीनंतर मात्र दवाखान्याची रयाच पालटली. सक्शन मशिन दुरुस्त झाले, दवाखाना स्वच्छ दिसू लागला. विशेष म्हणजे या दवाखान्यात पूर्वी दिवसाही बाळंतपणं केली जात नव्हती आता मात्र रात्रीदेखील बाळंतपणं केली जाऊ लागली. जनसंवादामध्ये दिलेल्या आश्वासनांची अशाप्रकारे पूर्ती झाली.

'एकसंघ युवा मंडळ' व 'लोकमंगल संस्था' यांनी संयुक्तपणे गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी तालुक्यात जनसंवादाचे आयोजन केले. गडचिरोलीमध्ये कुठल्याही सरकारी अधिकारी-कर्मचाऱ्याचे पोस्टिंग हे 'पनिशमेंट पोस्टिंग' मानले जाते. त्यामुळे इतर ठिकाणी कामचुकार ठरलेले लोक गडचिरोलीत पाठवले जातात. प्रशासनातील या 'पनिशमेंट' प्रकाराचा अनाठाई उपद्रव मात्र गडचिरोलीतील नागरिकांना सोसावा लागतो, या समस्येचे एक ढळढळीत उदाहरण चार्मोशीतील जनसंवादात पाहायला मिळाले.





# बेजबाबदार वैद्यकीय अधिकारी सुधारणार का?



चार्मोशी तालुक्यातील आमगाव प्रा. आ. केंद्राबद्दल जनसंवादात उपस्थितांनी अनेक समस्या मांडल्या. या दवाखान्यातील वैद्यकीय कर्मचारी ड्युटीवर असताना दारूच्या नशेत आढळतात, दवाखान्याची ओ.पी.डी. दिवसातून एकच वेळा सुरू असते, डॉक्टर निवासी सेवा देत नाहीत, जननी सुरक्षा योजनेचे पैसे लाभार्थ्यांना मिळालेच नाहीत अशा अनेक समस्या जनसंवादामध्ये मांडल्या गेल्या. या जनसंवादासाठी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांसह, पंचायत समितीचे सदस्यही उपस्थित होते. प्रशासनातील या अधिकारी मंडळींनी संबंधित डॉक्टरांना तक्रारींबद्दल स्पष्टीकरण मागितल्यावर डॉक्टरांनी 'सर्व तक्रारी खोट्या आहेत' असा पवित्रा घेतला.

डॉक्टरांनी सुधारणांची शाश्वती देण्याऐवजी समस्याच नसल्याचा आव आणल्याने जनसंवादात नागरिकांनी त्यांचे अनुभवच मांडायला सुरुवात केली. आमगाव प्रा.आ. केंद्राची रुग्णवाहिका एका रुग्णाला नाकारली गेली, त्याच दिवशी ती रुग्णवाहिका डॉक्टरांच्या परिचयातील एका व्यक्तीच्या लग्नसराईत राबवली गेली होती. ही तक्रार प्रत्यक्षदर्शीने मांडल्यावरही डॉक्टरांनी अजिबात दिलगिरी दाखवली नाही. परिणामी पंचायत सदस्यांनी या डॉक्टरांना चांगलेच फैलावर घेतले. त्यानंतर अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी 'आमगाव प्रा. आ. केंद्राशी निगडित सर्व तक्रारींचे निराकरण होईल' असे आश्वासन दिले.

पण प्रश्न आहे, गडचिरोलीत नियुक्ती मिळालेल्या बेजबाबदार अधिकारी-कर्मचारी वर्गाचा. या समस्येचे स्वरूप 'आडात नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार!' असे आहे. अर्थात जे मुळातच बेजबाबदार आहेत त्यांच्यात काहीही केल्याने सुधारणा होणार तरी कशी? असे असले तरी स्थानिक नागरिक अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या आश्वासनावर अजूनतरी विश्वास ठेवून आहेत.




*यवतमाळ जिल्ह्यातील यावली तालुक्यातील कारेगावच्या कुसुमबाई गाडेकर यांना बैलानं शिंग मारल्याचं निमित्त झालं. आणि त्यांना जखमेवर मलमपट्टी करून घेण्यासाठी सरकारी दवाखान्याच्या जाचाला सामोरं जावं लागलं. जनसंवादामध्ये तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सूचना देऊनही उपचार करण्यास टाळटाळ करणाऱ्या नर्सचा पिच्छा कुसुमबाईंनी हतबल न होता पुरवला. आपण पुढे होऊन ठामपणे बोललो तर मुजोर कर्मचाऱ्यांना नक्कीच वेसन घालता येऊ शकतं, हा विश्वास लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे कुसुमबाईंना मिळाला...*

# अखेर कुसुमबाईंची जखम बरी झाली...



बैलांना चारा टाकत असताना कुसुमबाईंना बैलाने शिंग मारले. मांडीला मोठी जखम झाली. घरातील लोकांनी त्यांना जवळच्याच वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. तेव्हा सकाळचे ८.३० वाजले होते. दवाखान्यात डॉक्टर हजर नव्हते. काही वेळाने नर्सने येऊन जखम पाहिली. जखम फारशी गंभीर नसल्याचे सांगून तात्पुरती मलमपट्टी करून नर्सने त्यांना घरी पाठविले. परंतु ३ दिवसाने जखमेत जंतुसंसर्ग झाल्याने जखमेतून पू मिश्रित पाणी येऊ लागले. त्रास असह्य होऊ लागला.

वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचा मागचा अनुभव फारसा चांगला नव्हता, म्हणून कुसुमबाईंनी यवतमाळच्या खासगी दवाखान्यात जाण्याचा निर्णय घेतला. खासगी दवाखान्यात उपचारासाठी त्यांना ४०,००० रुपये खर्च आला. डॉक्टरांनी कुसुमबाईंना जखमेची नियमित साफसफाई व मलमपट्टी करायला सांगितली. त्यासाठी दर तीन दिवसांनी त्याना दवाखान्यात जावे लागणार होते. फक्त मलमपट्टीसाठी त्यांना इतक्या दूर खासगी दवाखान्यात जाणं शक्य नव्हते. म्हणून त्यांनी वडगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाण्याचा निर्णय घेतला. मात्र कुसुमबाईंना तिथे फारच कटू अनुभव आला. 'आज नर्सबाई आलेल्या नाहीत, डॉक्टर सुट्टीवर

आहेत' असे सांगून तेथील कर्मचारी कुसुमबाईंवर नीट उपचार करण्याचे टाळत होते. जखमेची साफसफाई न करता वरचेवर मलमपट्टी करून तर कधी विना मलमपट्टी कुसुमबाईंची बोळवण केली जात होती. दोन अडीच महिने झाले तरी कुसुमबाईची जखम बरी होत नव्हती.

जनसंवादासाठी आरोग्य सेवांची माहिती गोळा करत असताना 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'च्या कार्यकर्त्यांना कुसुमबाईंबद्दल समजले. त्यांनी कुसुमबाईंना १७ मार्च २०१७ला होणाऱ्या जनसंवादात आपली व्यथा मांडायला बोलावले. कुसुमबाईंनी आपली सर्व हकीकत जनसंवादात मांडली. तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या तक्रारीची दखल घेऊन, वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टर व नर्सला याबाबत योग्य ती समज दिली. यापुढे कुसुमबाईंना चांगली वागणूक व योग्य उपचार देण्याच्या सूचनाही दिल्या.

दुसऱ्या दिवसापासूनच कुसुमबाई जखमेची साफसफाई व मलमपट्टी करून घेण्यासाठी वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊ लागल्या. जनसंवादात तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सूचना देऊनही परिस्थिती बदलली नव्हती. कुसुमबाईंनी जनसंवादात आपली तक्रार मांडल्याचा राग मनात ठेवून नर्स व कर्मचारी कुसुमबाईची हेटाळणी करू लागले. त्यांना उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. "ह्या बाईला सगळ्यांनी खूपच लाडावून ठेवलं" असे बोलू लागले. "तुम्ही जर माझ्या जखमेची साफसफाई व मलमपट्टी करणार नसाल, तर मी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना तुमची तक्रार करेल" असे सांगूनही त्यांच्या या बोलण्याला नर्सने व कर्मचाऱ्यांनी गांभीर्याने घेतले नाही. निराश कुसुमबाई 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'च्या कार्यकर्त्यांना भेटल्या. कार्यकर्त्यांने तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. गुजर यांना फोन लावून दिला. कुसुमबाईंनी डॉक्टरांकडे पुन्हा आपली व्यथा मांडली. डॉ. गुजर यांनी वडगाव प्रा.आ.केंद्रामध्ये फोन करून संबंधित नर्सला कडक समज देऊन कुसुमबाईंना नीट उपचार देण्याचे आदेश दिले. त्यांनी कुसुमबाईंना परत प्राथमिक आरोग्य केंद्रात जाण्यास सांगितले. कुसमबाई वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात पोहचल्यावर नर्सने त्यांना "डॉ. गुजर यांच्याकडे फोन करून तक्रार का केली?" अशी विचारणा केली. तेव्हा कुसमबाईंनी त्यांना सांगितले की, तुम्ही जर आधीच मला नीट सेवा दिली असती तर मी डॉ. गुजर यांच्याकडे धाव घेतली नसती. अखेर नर्सला ही मात्रा लागू पडली. नर्सला निमूटपणे कुसुमबाईंच्या जखमेची साफसफाई व मलमपट्टी करावी लागली. एवढंच नव्हे तर जखम चांगली होईपर्यंत ही सेवा त्यांना विना कुरकुर व्यवस्थितपणे मिळत राहिली.

लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे लोकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाल्याने, आरोग्य कर्मचारी व अधिकाऱ्यांना लोकांच्या प्रश्नाची दखल घ्यावी लागत आहे. आरोग्य कमर्चारी- अधिकारी या निमित्ताने लोकांप्रती उत्तरदायी होताहेत, हे आशादायक चित्र कुसुमबाईंसारख्या अनेक सेवा नाकारल्या गेलेल्यांना उभारी देत आहे.

*जनसंवादात रिक्त पदे भरण्याचे आश्वासन देऊनही त्याची पूर्तता होत नाही म्हटल्यावर लोकांनीच आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिति सभापती, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी सततचा पत्रव्यवहार सुरु केला. गडचिरोली जिल्ह्याच्या जिल्हा सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये हा मुद्दा मांडला. शेवटी जिल्हा आरोग्य यंत्रणेला विहीरगावच्या आरोग्य पथकात पदे भरावी लागली. विहीरगावच्या लोकांनी एकत्र येत आपल्या गावातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी घेतलेला पुढाकार हा इतर गावातील लोकांसाठी एक जिवंत उदाहरण ठरले आहे.*

# विहीरगावचे आरोग्य पथक झाले पुन्हा कार्यरत



देसाईगंज तालुक्यातील विहीरगावचे आरोग्य पथक मागील दोन वर्षांपासून औषधनिर्माता आणि एक ए.एन.एम या दोघांच्या भरवशावरच चालत होते. वैद्यकीय अधिकारी ए.एन.एम, एम.पी.डब्ल्यूची पदे मागील एक वर्षापासून रिक्त होती. याबाबत औषधनिर्माता, ए.एन.एम. यांनीही वरिष्ठांजवळ कधी तक्रार केली नाही. परिणामी परिसरातील नागरिकांना सरकारी आरोग्यसेवांच्या लाभापासून वंचित राहावे लागत होते. नाईलाजाने लोक खासगी आरोग्यसेवेकडे वळत होते. विहीरगावच्या ग्रामस्थांनी अनेकदा ग्रामपंचायत, पंचायत समिती, ग्रामसेवक यांच्याकडे निवेदने दिली. परंतु या सर्वांचा फारसा काही उपयोग झाला नाही. लोकाधारित देखरेख प्रक्रियेंतर्गत जनमत चाचणी घेताना ही माहिती उघडकीस आली की अनेकदा निवेदने, अर्ज देऊनही तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. दिलीप कांबळे हे या गोष्टींकडे लक्ष देत नाहीयेत.

मार्च २०१६ च्या जनसंवादात गावकऱ्यांनी विहीरगाव आरोग्य पथकाच्या रिक्त पदांचा मुद्दा मांडला. जनसंवादामध्ये लोकप्रतिनिधी, तालुका वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय

अधिकारी, नर्स, ए.एन.एम. ग्रामस्थ, पत्रकार उपस्थित होते. सर्वांसमोर ह्या मुद्द्यावर चर्चा झाली. उपस्थित लोकप्रतिनिधी व लोकांच्या तक्रारीचा धारदार सूर पाहून तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना रिक्त पदे भरण्याचे आश्वासन द्यावे लागले. पोकळ आश्वासनांवर लोक खूष झाले खरे पण रिक्त पदे काही भरली गेली नाहीत. ही बाब लोकांच्या लवकरच लक्षात आली. तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपली फसवणूक केली असल्याची भावना लोकांमध्ये निर्माण होऊ लागली.

तेव्हा लोकांनीच विहीरगाव आरोग्य पथकातील रिक्त पदांचा मुद्दा आपल्या पातळीवर सोडवण्याचे ठरवले. जिल्हा पातळीवर आरोग्य विभागाशी सतत पाठपुरावा सुरू केला. आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिति सभापती, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी सततचा पत्रव्यवहार सुरू केला. गडचिरोली जिल्ह्याच्या जिल्हा सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये हा मुद्दा मांडला. विहीरगावचे लोक आता मागे हटायच्या मनस्थितीत नव्हते. शेवटी जिल्हा आरोग्य यंत्रणेला विहीरगावच्या आरोग्य पथकात पदे भरावी लागली. लोकाधारित देखरेखीमुळे लोक एकत्र आले. त्यांनी जिल्हा यंत्रणेवर दबाव आणत आपल्या आरोग्य पथकाचा प्रश्न सोडवला. आणि खासगी आरोग्यसेवेपासून आपली सुटका करून घेतली. विहीरगावच्या लोकांनी एकत्र येत आपल्या गावातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी घेतलेला पुढाकार हा इतर गावातील लोकांसाठी एक जिवंत उदाहरण ठरले आहे.







# गाव आरोग्य समितीचा पुढाकार



*गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील जयश्री बंडू सोनटक्के या आदिवासी महिलेला ती परगावची आहे म्हणून गरोदरपणातील आरोग्य सेवा देण्याचे टाळाटाळ करणाऱ्या आरोग्य सेविकेला गाव आरोग्य समितीने चांगलेच वठणीवर आणले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन जयश्रीची नाव नोंदणी व तिला आवश्यक आरोग्यसेवा मिळण्याची व्यवस्था केली.*

माहेरी पतीसोबत भांडण झाल्याने जयश्री बंडू सोनटक्के ही आदिवासी महिला तिच्या माहेरी कन्हाळगाव येथे आली. त्यावेळी ती एक महिन्याची गरोदर होती. तिची नोंदणी तिच्या सासरी म्हणजे कोनसरी येथे झाली नव्हती. ती दुसऱ्या गावाची आहे म्हणून कन्हाळगाव उपकेंद्राच्या आरोग्य सेविकेने तिचे नाव नोंदवून घेतले नव्हते. ती नाव नोंदणीसाठी गेली 'तेव्हा तू परगावची आहे, तुला कोनसरीमध्ये जाऊनच नोंद करावी लागेल, इथे तुझी नोंद होणार नाही' असे सांगून तिला परत पाठवले. जयश्रीला परत सासरी जायची इच्छा नसल्याने ती कोनसरीला परत नाव नोंदणीसाठी गेली नाही. कन्हाळगाव उपकेंद्राच्या आरोग्य सेविकेनेही परत तिची कधी विचारपूस केली नाही. आठवा महिना सुरू झाला तरी तिला गरोदरपणातील कोणतीही सेवा मिळाली नव्हती. ना तिचे वजन घेतले गेले, ना तिची पोटावरून तपासणी झाली, सोनोग्राफी तर दूरच. तिला गरोदरपणातत काय काळजी घ्यायची याची साधी माहितीही नर्सने दिली नाही.

या दरम्यान लोकाधारित देखरेख प्रक्रियेंतर्गत 'लोकमंगल संस्थे'चे कार्यकर्ते गाव पातळीवरील आरोग्य सेवांचा आढावा घेत होते. कन्हाळगावाच्या गाव आरोग्य समितीच्या बैठकीत हा मुद्दा पुढे आला. उपस्थितीत आरोग्य सेविकेला याबाबत विचारणा केली असता, ती बाई परगावची असल्याने आपल्याला कन्हाळगाव उपकेंद्रात तिची नोंद करता येत नाही

असे सांगितले.

या मुद्याची गाव आरोग्य समितीने व कार्यकर्त्यांनी गंभीर दखल घेतली. परगावच्या गरोदर महिलांना आरोग्यसेवा देता येणार नाही असे कोणत्या कायद्या अंतर्गत नमूद आहे? या प्रकारच्या सेवा नाकारण्याचे लिखित नियम आहेत काय? या महिलेला आरोग्यसेवा मिळण्याचा अधिकार आहे. तुम्ही तिला तिच्या हक्कापासून वंचित ठेवत आहात असे होता कामा नये. आत्ताच्या आता तिचे नाव नोंदणी करा, तिला ज्या काही अत्यावश्यक सेवा लागतील त्या लगेच पुरवल्या जाव्यात अन्यथा तुमची तक्रार वरिष्ठ पातळीवर केली जाईल अशी समितीने भूमिका घेतली. तरी आरोग्य सेविका नाव नोंदणी करण्यास टाळाटाळ करू लागली. तेव्हा समिती सदस्यांनी याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कट्टेवार यांना फोनवरून तक्रार केली. डॉ. कट्टेवार यांनी जयश्रीची नाव नोंदणी करून घेण्याची व तिला सर्व सेवांचा लाभ देण्याची सूचना केली. तसेच तिला आवश्यक आरोग्यसेवा मिळण्याची व्यवस्था केली. तेव्हा कुठे आरोग्य सेविकेने जयश्रीची नाव नोंदणी करून घेतली. तिची तपासणी केली. तिला रक्ताची कमतरता असल्याने तिला चंद्रपूरला पुढील तपासणीसाठी व उपचारांसाठीही पाठविले. लोकाधारित देखरेख प्रक्रियेच्या माध्यमातून लोक आपल्या आरोग्य हक्कांबद्दल जागरूक होऊ लागले आहेत. गाव आरोग्य समित्या कार्यरत होऊ लागले आहेत. गाव आरोग्य समित्या कार्यरत होऊ लागल्या आहेत. जयश्रीसारख्या महिलांना त्यांचा आरोग्य सेवेचा हक्क मिळवून देऊ लागल्या आहेत.







# आरोग्य समस्यांचा चेंडू आमदारांच्या ‘कोर्टात’

*आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेने सरकारी आरोग्यसेवांशी निगडित अनेक प्रश्न वारंवार ऐरणीवर आणलेत. पण या समस्यांची वाटचाल मुख्यतः वैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते नि समस्यांची झळ बसणारे नागरिक यांच्यातच भिरभिरत राहिली आहे. लोकप्रतिनिधी अर्थात स्थानिक आमदारांनाही आरोग्यसेवांची जाणीव झाली पाहिजे, त्यांनी या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत यासाठी जनसंवादांच्या पॅनेलमध्ये काही ठिकाणी आमदारांना सामावून घेतले गेले. या प्रसंगी आमदारांनी आरोग्यसेवा सुधारण्यासाठी दिलेली वक्तव्य नि आश्वासनं...*

## बेजबाबदार वैद्यकीय अधिकाऱ्यांवर तात्काल कारवाई करा!

२४ फेब्रुवारी, २०१५ रोजी गडचिरोली तालुकास्तरीय जनसंवाद झाला. गडचिरोलीतील जनसंवादात प्रथमच स्थानिक आमदार देवराव होळी यांनी उपस्थिती नोंदवली. या जनसंवादात जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन व जिल्हा आरोग्य अधिकारीही सहभागी झाले. यावेळी उपस्थित नागरिकांनी मुख्यतः अंगणवाड्यांशी निगडित समस्या, तक्रारींचा पाढा वाचला. अंगणवाड्यांच्या नादुरुस्त इमारती व रखडलेली बांधकामे यांचे पुरावेच जनसंवादामध्ये सादर करण्यात आले. तसेच पोटेगाव व अमिर्झा प्रा. आ. केंद्रात डॉक्टरांच्या निवासाची सुविधा नाही, प्रा. आ. केंद्रात पाण्याची सुविधा नाही या समस्याही आमदारांपुढे मांडण्यात आल्या. जिल्हा रुग्णालयात आलेल्या रुग्णांकडून बेकायदेशीर पैसे घेतले जातात. अशी तक्रारही यावेळी करण्यात आली.

जनसंवादात उपस्थित समस्यांचा आढावा घेऊन आमदार होळी यांनी आपली नाराजी व्यक्त करत 'बेजबाबदार वैद्यकीय अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी' अशी सूचना उपस्थित अधिकाऱ्यांना केली. 'स्थानिक नागरिकांची गैरसोय विचारात घेऊन अमिर्झा प्रा. आ. केंद्राच्या जागी ग्रामीण रुग्णालय करावे यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करीन' असे आश्वासनही यावेळी आमदारांनी दिले. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव तयार करून पाठवावा अशी विनंतीही त्यांनी अधिकाऱ्यांना केली.

■ *डॉ. देवराव होळी, आमदार*
*गडचिरोली विधानसभा क्षेत्र*



# मद्यपी डॉक्टरांना आमदारांची तंबी!



१६ जून, २०१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात जनसंवाद झाला. तालुक्यातील शेकडो नागरिक या जनसंवादाला उपस्थित होते. नागरिकांनी आरोग्य सेवांशी निगडित केलेल्या तक्रारींना उत्तरे देण्यासाठी तालुक्यातील जवळपास सर्वच प्रा. आ. केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही यावेळी हजर होते. यावेळी येथील स्थानिक आमदार दादाराव केचे यांनी जनसंवादांचे एक पॅनेलिस्ट म्हणून कामकाज पाहिले.

सरकारी दवाखान्यांमधील अस्वच्छता, आशा कार्यकर्त्यांकडे औषधे नसतात या समस्या यावेळी प्रकर्षाने मांडल्या गेल्या. या समस्यांची दखल घेत आमदारांनी स्थानिक अधिकाऱ्यांकडून लवकरात लवकर सुधारण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी 'एक तालुका वैद्यकीय अधिकारी मद्यधुंद अवस्थेत दवाखान्यात असतात' अशी तक्रार उपस्थितांनी केली. या समस्येची गंभीर दखल घेत आमदार महोदयांनी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'पुन्हा मद्यधुंद अवस्थेत दवाखान्यात आढळल्यास तुमची हयगय न करता गंभीर कारवाई होईल' अशी तंबी जनसंवाद या जाहीर कार्यक्रमात दिली.

*■ दादाराव केचे, आमदार*
*आष्टी विधानसभा क्षेत्र*

# यवतमाळ जिल्ह्यात लोकाधारित देखरेख सुरू व्हावी!




१९ जानेवारी, २०१५ रोजी यवतमाळमधील घाटंजी तालुक्यात जनसंवाद झाला. या जनसंवादाला येथील स्थानिक आमदार राजू तोडसाम यांनी आवर्जून उपस्थिती नोंदवली. विशेष म्हणजे जनसंवादात सहभागी होण्याआधी आमदार महोदयांनी तालुक्यातील सरकारी दवाखान्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन येथील आरोग्य सेवांचा आढावा स्वतःच घेतला होता. त्यामुळे जनसंवादात उपस्थित झालेल्या तक्रारींची शहानिशा आमदारांनी आधीच केल्याने समस्यांची तीव्रताही आमदारांना ठाऊक होती.

येथील तीन प्रा. आ. केंद्रांच्या क्षेत्रात २१ बालमृत्यू, वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी निवासी सेवा देत नाहीत, सरकारी दवाखान्यांमध्ये बाळंतपणाच्या सेवा मिळत नाहीत या अत्यंत गंभीर समस्यांची चर्चा या जनसंवादामध्ये झाली. 'शिवणी प्रा. आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी दवाखान्यात कुठलीही सेवा न देता पगार मात्र नियमित घेतात.' या तक्रारीची सत्यसत्यता आमदार महोदयांनी आधीच पडताळली असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई झाली याचा अहवाल आमदारांनी अधिकाऱ्यांकडे मागितला. तसेच निवासी सेवा न देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना दोन दिवसांच्या आत सेवेवर रुजू होण्याचा आदेशही आमदारांनी यावेळी दिला.

आरोग्यसेवांशी निगडित समस्यांवर जनसंवाद हा अत्यंत जनहिताचा असून यापुढील काळात यवतमाळ जिल्ह्यात आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रिया सुरू व्हावी यासाठी आपण स्वतः राज्यस्तरावर पाठपुरावा करू असे आश्वासनही तोडसाम यांनी यावेळी दिले. घाटंजीतील आरोग्य सेवांचा पाठपुरावा करण्यासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली नियमित बैठका घेण्याची सुचनाही यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना दिली. आमदारांची उपस्थिती व त्यांनी जनसंवादापूर्वी घेतलेला आरोग्य सेवांच्या सद्यःस्थितीचा आढावा यामुळे या जनसंवादाला वेगळीच धार चढली होती.

■ *राजू तोडसाम, आमदार घाटंजी विधानसभा क्षेत्र*

# औषध तुटवड्याची गंभीर समस्या विधानसभेत मांडणार!



सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात जनसंवाद झाला. या जनसंवादामध्ये तालुक्यातील वीस गावातील नागरिक सहभागी झाले होते. येथील स्थानिक आमदार गणपतराव देशमुख यांनी अत्यंत सहृदयतने आरोग्यसेवांशी निगडित समस्या यावेळी समजावून घेतल्या.

सरकारी दवाखान्यात दुर्लक्ष झाल्यामुळे एका महिलेला खासगी दवाखान्यात बाळंतपण करावे लागले नि २८ हजारांचा नाहक खर्च करावा लागला, कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रियेसाठी महिलांकडून पैशांची मागणी, जवळा प्रा. आ. केंद्राच्या आशा कार्यकर्तींना दोन वर्षे मानधन नाही, तालुक्यातील काही सरकारी दवाखान्यांची अत्यंत दयनीय अवस्था या समस्या यावेळी मांडण्यात आल्या.

उपस्थित झालेल्या समस्यांची तीव्रता लक्षात घेता आमदार देशमुख यांनी अधिकाऱ्यांना 'समस्यांची कारणे सांगू नका, उपाययोजना सुचवा' अशा शब्दात सुधारणा करण्याविषयी सुचवले. तसेच प्रत्येक सरकारी दवाखान्यात तक्रार पेटी ठेवावी, आरोग्य विभागातील रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत यासाठी पाठपुरावा करावा अशा सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या. आपण स्वतः आरोग्य समस्या सोडवण्यात प्रयत्नशील राहूच पण विशेषतः औषध तुटवड्याची समस्या विधानसभेतही मांडू असे आश्वासन यावेळी आमदार महोदयांनी दिले.

*गणपतराव देशमुख, आमदार*
*सांगोला विधानसभा क्षेत्र*

राष्ट्रीय आरोग्य अभियांनांतर्गत आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया,

## ऐच्छिक पद्धतीने देखरेख प्रक्रिया राबवणाऱ्या संस्था

| क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १. | रत्नागिरी | १) **संवाद,**<br>ता. चिपळूण, जि. रत्नागिरी |
| २. | सिंधुदुर्ग | २) **अभिनव फाऊंडेशन,**<br>सांवतवाडी, जि. सिंधुदुर्ग |
| | | ३) **श्री. सिद्धेश्वर ग्रामोत्कर्ष,**<br>ता. सांवतवाडी, जि. सिंधुदुर्ग |
| ३. | अहमदनगर | ४) **लोकपंचायत,**<br>संगमनेर, जि. अहमदनगर |
| ४. | नांदेड | ५) **अंकुर युवा प्रतिष्ठाण,**<br>ता. कंधार, जि. नांदेड |
| ५. | उस्मानाबाद | ६) **संतगाडगेबाबा स्वयंसेवी संस्था,**<br>ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद |
| ६. | सोलापूर | ७) **अस्तित्व समाजविकास व संशोधन संस्था,**<br>सांगोला, जि. सोलापूर |
| | | ८) **दिशा समाजविकास संस्था,**<br>ता. बार्शी, जि. सोलापूर |
| ७. | सांगली | ९) **संपदा ग्रामीण महिला संस्था,**<br>ता. खानापूर, जि. सांगली |
| | | १०) **ग्रामविकास बहुउद्देशीय संस्था,**<br>मिरज-सांगली रोड, जि. सांगली |
| ८. | अमरावती | ११) **ड्रीम बहुउद्देशीय संस्था,**<br>तिवसा, जि. अमरावती |

| क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| ९. | भंडारा | १२) **भारतीय औषधी अनुसंधान संस्था,**<br>तुमसर, जि. भंडारा |
| | | १३) **ग्रामीण युवा प्रागतिक मंडळ,**<br>जि. भंडारा ४४१९०४ |
| १०. | गडचिरोली | १४) **लोकमंगल संस्था,**<br>चामोर्शी, गडचिरोली |
| | | १५) **एकसंघ युवा मंडळ,**<br>मु. सगनापूर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली |
| | | १६) **स्पर्श (सोसायटी फोर पीपल्स ॲक्शन इन रूरल सर्व्हिस ॲन्ड हेल्थ),**<br>केशवसुत, धानोरा रोड, ता. गडचिरोली |
| ११. | यवतमाळ | १७) **सृष्टी संस्था**<br>ता. कुरखेडा, जि. गडचिरोली |
| | | १८) **ग्रामज्योत समाजसेवी संस्था**<br>ता. जि. यवतमाळ |
| | | १९) **ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट,**<br>ता. वणी, जि. यवतमाळ |
| | | २०) **रसिकाश्रय सांस्कृतिक कला व बहुउद्देशीय संस्था,**<br>घाटंजी, जि. यवतमाळ |
| १२. | वाशिम | २१) **मनोदय समाज कल्याण संस्था,**<br>कामरगाव, ता. कारंजा (लाड) जि. वाशिम |




# पडघम... आरोग्य सेवांमधील बदलांचे

ऐच्छिक तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या लोकाधारित देखरेख प्रक्रियेमुळे
आरोग्य सेवांमध्ये झालेल्या बदलांचे संकलन...

या पुस्तिकेत आरोग्य सेवांवर ऐच्छिक तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील घटना घडामोडींचा कोलाज संकलित झाला आहे. शास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून एखाद्या प्रक्रियेने घडवलेल्या संख्यात्मक बदलांचं आकलन होऊ शकतं. व्यापक महत्त्व असलेले गुणात्मक प्रभाव दाखवणारे बदल मात्र आकडेवारीच्या गर्दीत हरवून जातात. एखादा बदल एखाद्याच गावात घडतो पण तो बदलांची एक नवी दिशा सुचवतो. अशा शासकीय आरोग्य यंत्रणेकडे पाहण्याची नवी दृष्टी देणाऱ्या घटना-घडामोडी या दस्तऐवजात आहेत.

वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच कुणाही जिज्ञासू वाचकांना या पुस्तिकेद्वारे सरकारी आरोग्यसेवांमधील सकारात्मक बदलांची प्रेरणा मिळेल.


साथी प्रकाशन